# क्विक हिल करणार इंदूरमध्ये सायबर क्राइम जागरूकता

## १२ दिवसांत १०० हून अधिक पथनाट्ये सादर केली जाणार



**मुंबई (प्रतिनिधी):** सायबर क्राइमबाबत जागरूकता वाढवण्यासाठी इंदूर शहर सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा उपक्रम राबविण्यात येणार आहे. क्विक हिल टेक्नॉलॉजी व्यावसायिक सामाजिक जबाबदारी (सीएसआर) म्हणून त्यांच्या क्विक हिल फाउंडेशन (क्यूएचएफ) च्या माध्यमातून हा उपक्रम राबविणार आहे. या उपक्रमासाठी इंदूर शहर पोलिस आणि सायबर सेलची टीम मदत करणार असून १२ दिवसांत १०० हून अधिक पथनाट्ये केले जाणार आहेत. या उपक्रमाचा भाग म्हणून कंपनीने 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' हा विशेष उपक्रम लाँच केला आहे. जो, स्मार्ट शहरांमध्ये सायबर सुरक्षेबद्दल लोकांना जागरूक करण्यासाठी पथनाट्यांची मालिका आहे. या उपक्रमाचे उद्धाटन २६ एप्रिल २०२२ रोजी पोलिस आयुक्त आणि उपायुक्त (गुन्हे) एच. एन. मिश्रा यांच्या हस्ते करण्यात आले.

अतिरिक्त पोलिस आयुक्त व पोलिस उपायुक्त (वाहतूक) मनीष कपूरिया, अतिरिक्त पोलिस आयुक्त (मुख्यालय व गुन्हे) व उपायुक्त झोन ४ राजेश हिंगणकर आणि क्यूएचएफच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यावेळी उपस्थित होते.